# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना** :- केंद्रशासन पुरस्कृत प्रधानमंत्री पथ विक्रेता आत्मनिर्भर निधी
**{समाज.वि.विभाग}** (PM SVANidhi) योजने अंतर्गत स्वनिधी से समृद्धी योजनेकरिता पात्र पथ विक्रेत्यांचे सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण (Socio-Economic Profiling) करून विविध ८ योजनांचा लाभ उपलब्ध करून देण्याकरिता संस्था / कंपनीची नेमणूक करण्याकरिता https://mahatenders.gov.in या संकेत स्थळाच्या माध्यमातून ई-निविदा काढण्यात आली आहे. सदर सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण (Socio-Economic Profiling) करण्याकरिता येणारा अंदाजित खर्च रू. ३४,५६,०२४/- पद क्र. A-47702474617 (पी. एम. स्वनिधी) मधून करण्यात येईल. सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण (Socio-Economic Profiling) करण्याकरिता ई-निविदेच्या माध्यमातून खालील नमूद केल्याप्रमाणे कंपनीची निवड करण्यात आली आहे.

| अनु.क्र . | संस्थाकंपनीचे नाव / | ई निविदा रक्कम-(.रू) |
|---|---|---|
| १ | ईगोलाईफ ईकॉमर्स लिमिटेड.इंदौर , | ३४,५६,०२४/- |
| **एकूण** | | **३४,५६,०२४/-** |

उपरोक्त तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे एकूण रू. ३४,५६,०२४/- खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करणे तसेच निवड झालेल्या कंपनीला कार्यादेश देण्याचा प्रश्न विचारात घेऊन मंजुरी प्रदान करणे. सदर विषय आर्थिक बाब असल्यामुळे विषयाचे प्रारूप मा. आयुक्त तथा प्रशासक यांना पाठविण्यास्तव सादर प्रस्तुत.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 1057/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :- 25/09/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त, समाज विकास विभाग, यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार केंद्रशासन पुरस्कृत प्रधानमंत्री पथ विक्रेता आत्मनिर्भर निधी (PM SVANidhi) योजने अंतर्गत स्वनिधी से समृद्धी योजनेकरिता पात्र पथ विक्रेत्यांचे सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण (Socio-Economic Profiling) करून विविध ८ योजनांचा लाभ उपलब्ध करून

देण्याकरिता संस्था / कंपनीची नेमणूक करण्याकरिता https://mahatenders.gov.in या संकेत स्थळाच्या माध्यमातून ई-निविदा काढण्यात आली आहे. सदर सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण (Socio-Economic Profiling) करण्याकरिता येणारा अंदाजित खर्च रू. ३४,५६,०२४/- पद क्र. A-47702474617 (पी. एम. स्वनिधी) मधून करण्यात येईल. सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण (Socio-Economic Profiling) करण्याकरिता ई-निविदेच्या माध्यमातून खालील नमूद केल्याप्रमाणे कंपनीची निवड करण्यात आली आहे.

| अनु.क्र . | संस्थाकंपनीचे नाव / | ई निविदा रक्कम- (.रू) |
|---|---|---|
| १ | ईगोलाईफ ईकॉमर्स लिमिटेड.इंदौर , | ३४,५६,०२४/- |
| **एकूण** | | **३४,५६,०२४/-** |

उपरोक्त तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे एकूण रू. ३४,५६,०२४/- खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करणे तसेच निवड झालेल्या कंपनीला कार्यादेश देण्याचा प्रश्न विचारात घेऊन मंजुरी प्रदान करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मान्यता प्रदान केली.